www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 307 सोमवार दि. 21 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## सर्व व्यापारी जनतेच्या पाठीशी साकोली पोलीस - एसडीपीओ आनंद चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

"भंडारासर्व लहान मोठ्या व्यापारी जनतेच्या पाठीशी साकोली पोलीस खंबीरपणे उभी आहे. ऑनलाईन फसवणूकीचे प्रसंग आल्यास तातडीने पोलीसांना सुचना द्यावी त्याची जलदगतीने दखल घेणार" असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद चव्हाण यांनी केले. ते ( शनि. १९ जुलै ) ला शहरात विदर्भ निधी अर्बन को ऑप बॅंकेच्या आयोजित "व्यापारी मेळावा" प्रसंगी बोलत होते. तर सायबर क्राईमवर व्यापारी बंधूंनी सतर्क व सावधान रहावे असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर यांनी याप्रसंगी केले. साकोलीत व्यापारी जनतेला एक खुला मंच मिळावा. त्यांच्या प्रत्येक आर्थिक स्थितींवर तोडगा काढण्यासाठी विदर्भ निधी अर्बन को ऑप बॅंकेचे अध्यक्ष प्रविण भांडारकर यांनी या व्यापारी मेळाव्याचे आयोजन भारत सभागृहात केले होते. "बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२५" हे विदर्भ निधी बॅंकेचा उपक्रमाने या मेळाव्याचे खास उद्देश म्हणजे लहान मोठ्या सर्व व्यापाऱ्यांसाठी हा व्यासपीठ आदान-प्रदान व संवादासाठी एक उत्तम संधी ठरेल हा हेतू होता. याप्रसंगी मंचावर उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद चव्हाण, जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे अध्यक्ष सुनिल फुंडे, विदर्भ निधी बॅंकेचे अध्यक्ष प्रविण भांडारकर, प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर, सायबर सेल भंडाराचे दिपक खेडीकर, व्यापारी मार्गदर्शक सीए पंकज मुंदडा, गौरव लीचडे, अचल गभने, विधीतज्ञ अड. दिलीप कातोरे, पत्रकार संघ अध्यक्ष राजेशसिंह बैस, व्यापारीबंधू राजकुमार मल्लानी, अनिल गुप्ता, तरूण मल्लानी, अनुपम गुप्ता, अशोक मल्लानी, हेमकृष्ण वाडीभस्मे, नेपाल रंगारी, गंगाराम मेश्राम, प्रवीण पटेल, मंदार खेडीकर, प्रकाश रोकडे, निखिल आदमने, विदर्भ निधीचे मुख्य अधिकारी अतुल भांडारकर आदी मान्यवर हजर होते.

## वृक्षतोड थांबवा, अन्यथा येणाऱ्या काळात निसर्ग कोप परवडणार नाही :पंजाबराव डख

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**

एकीकडे शासन वृक्ष लागवड करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत आहे. वृक्षारोपण ही चळवळ पुढे नेण्यासाठी अनेक सामाजिक संघटना जीवाचे रान करीत आहेत. तरीही राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरूच आहे. याला शासकीय यंत्रणांनी वेळीच पायबंद घालण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजचे आहे. येणाऱ्या काळात जर वृक्षतोड थांबली नाही तर निसर्गाचा कोप होणार असून तो कुणालाच परवडणार नसल्याचे मत हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केले. ते आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने वृक्षमित्र पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष योगेश भंडारी, सचिव हेमंतकुमार पोखरणा, हितेश जामदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, माजी सभापती संजय ढोबळे, मोटार परिवहन अधिकारी अविनाश दळवी, माजी सरपंच अनिल ढोबळे, गोकुलदास मेहेर, बाबूलाल भंडारी, डॉ उमेश गांधी, महेंद्र पटवा, कांतीलाल चानोदिया, बिपीन भंडारी, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुणे येथील इलेस्टिक रन कंपनी कडून शाळेला१७ लॅपटॉप देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते राज्यात विविध भागात वृक्ष चळवळ उभी करणाऱ्याना वृक्षमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये महेश खरमाळे, प्रशांत गिर्हे, प्रशांत मुथा, सुहास कडू, शिवशंकर चाफुले, मिलिंद गिरधारी, सचिन झाडमुखे, तनुजा डोके, वैष्णवी पाटील, शिवाजी पठाडे, काका काकडे, योगेश चौधरी, महेश पोतदार, भरत गायकवाड यांचा समावेश होता. पुढे बोलताना डख म्हणाले की, पुढील आठवड्यात राज्यात जोरदार पाऊस पडणार असून २५ जुलै पर्यंत आष्टी तालुक्यात समाधानकारक पाऊस पडणार आहे. डख यांनी निसर्गाचे अनेक संकेत उपस्थित शेतकरी वर्गांना समजावून सांगत आपण हवामानाचा अंदाज कसा काढतो हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. भविष्यात देश व



राज्य प्रदूषणाचा बळी पडणार असून यामुळे वातावरणात मोठ्याप्रमाणावर बदल घडवून येत आहे, हे मानवी जीवनासाठी धोक्याची घंटा आहे. अमाप अशी होणारी वृक्षतोड मानवी जीवनाला संपुष्टात आणील. यावर वेळीच आवर घालून प्रत्येकाने पर्यावरणचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे सचिव हेमांतकुमार पोखरणा यांनी सांगितले की, अमोलक संस्थेने यावर्षी शंभर वर्षे पूर्ण केले आहेत. संस्था सामाजिक बांधिलकी म्हणून विविध प्रकारचे उपक्रम राबविले आहेत. यापुढेही संस्था असेच सामाजिक उपक्रम राबविणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी हितेश जामदार, दिलीप पटवा, रमेश खरमाळे, मोटार परिवहन अधिकारी अविनाश दळवी यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहरलाल भंडारी यांनी केले.

## रस्त्यावर टाकण्यात आलेल्या रॅबिटने भरलेल्या गोण्यांचा नागरिकांना त्रास ; संबंधित गोण्या टाकणाऱ्या कंत्राटदार व्यक्तीला मनपा घ.क.व्य विभागाच्या अधिकाऱ्यांचा आशिर्वाद

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज);**







अमृत नगर ओएनजीसी कॉलनी बॅंक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर सतत रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकल्या जात आहेत.बांधकामाचे कंत्राट घेणारा येथील एक स्थानिक कंत्राटदार व्यक्ती वारंवार सतत तोडकाम करण्यात आलेल्या बांधकामांच्या रॅबिटने भरलेल्या भरमसाठ गोण्या मुख्य रस्त्यावर टाकत आहे.तसेच बाजूलाच असलेल्या मोठ्या नाल्यातही हा कंत्राटदार व्यक्ती रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकून देत आहे.मुख्य म्हणजे मुख्य रस्त्यावर या गोण्या टाकत असल्यामुळे याठिकाणी आता पावसाळ्यात पावसाच्या पाण्याला या गोण्या अडथळा ठरत असून यामुळे याठिकाणी कचरा साचून आजूबाजूच्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.यामुळे परिसरातील नागरिकांना आणि वाहनांना येण्या-जाण्यास या गोण्यांमुळे अडचण निर्माण होत आहे आणि आरोग्याच्या समस्याही वाढण्याची शक्यता आहे.याबाबत याठिकाणी समोरच असलेल्या अमृत नगर मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या चौकीमध्ये येथील संबंधित चौकीचे अधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रार देण्यासाठी गेल्यास ते बोलतात मी यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू शकत नाही कारण त्या कंत्राटदार व्यक्तीचे आमच्या विभागाच्या वरिष्ठ लेव्हला हात पोहचले असून तो वरपर्यंत हाप्ते देऊन अधिकाऱ्यांना मॅनेज करतो. त्यामुळे मी यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू शकत नाही.या कंत्राटदार व्यक्तीला वरिष्ठांचा आशिर्वाद आहे असे मनपा चौकी प्रमुख यांचे म्हणणे आहे.तसेच वारंवार याबाबत तक्रार करूनही संबंधित मनपा घन कचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी रस्त्यावर रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकणाऱ्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नसून त्यांच्याच कृपाशीर्वादाने या व्यक्तीचे फावले आहे असे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.तसेच नागरिकांच्या समस्यांचे आणि तक्रारीचे संबंधित प्रशासनाला काहीही पडले नसल्याचे याठिकाणी दिसत आहे.

## राजिप मा. सदस्य विलास शेठ फडके यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल ग्रामीण भागातील शाळांना मोफत वह्या वाटप...

**दैनिक युवक आधार**


**पनवेल वार्ताहर**- रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य विलास शेठ फडके यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दिनांक 28 जुलै रोजी जिल्हा परिषद शाळा केवाळे, सुधागड विद्यालय केवाळे जिल्हा परिषद शाळा हरिग्राम, जिल्हा परिषद शाळा करवलीवाडी तसेच दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळा शिवनसई-आंबे,चिंचवली, दूंदरे धुंदरेपाडा, दूंदरे, रिटघर आणि भैरवदेव विद्यालय रिटघर , आदी शाळेंना मान्यवरांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आल्या उपस्थित मान्यवरांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले यावेळी सुभाष शेठ भोपी व विलास फडके आणि मान्यवारांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

यावेळी उपस्थित मान्यवर दूंदरे ग्रामपंचायत सरपंच सुभाष शेठ भोपी, क्रांतिकारी सेवा संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष नामदेव शेठ फडके,रायगड जिल्हा बॅंकेचे संचालक संतोष पाटील, शेखर शेळके क्रांतिकारी सेवा संघाचे नरेंद्र भोपी रायगड भूषण मा सरपंच भारत भोपी दिलीप उलवेकर विश्वास पाटील रायगड भूषण महादेव गायकर, शुभम सिनारे,सदस्य महेश पाटील शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते



## सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थिनींना आरोग्य विषयक मार्गदर्शन व सॅनिटरी नॅपकीन वाटप

**दैनिक युवक आधार**
**अंबरनाथ प्रतिनिधी**
**गुरुनाथ तिरपणकर**



शालेय मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन मिळणे ही आता काळाची गरज ठरलेली आहे.त्याच अनुषंगाने सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन, अंबरनाथ यांच्या वतीने१९जुलै२०२५रोजी भाऊसाहेब परांजपे विद्यालय, कानसई, अंबरनाथ पूर्व येथे विद्यार्थिनींसाठी एक महत्त्वाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थिनींना आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले, तसेच त्यांना मोफत सॅनिटरी नॅपकीन्सचे वाटत करण्यात आले.याप्रसंगी डॉ.सौ. अरुणा गणेश राठोड(एम.बी.बी.एस.,डी.जी.ओ.स्त्री रोग आणि प्रसुती तज्ञ) यांनी विद्यार्थिनींना आरोग्याविषयी सखोल माहिती दिली.तसेच कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या आशा स्वयं सेविका संजीवनी पाटील यांनी मुलींची शारीरिक जडणघडण, आहार,पालकांची जबाबदारी, आरोग्य व स्वच्छता अशा विविधांगी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अंटी पायरसी सेल, मुंबईचे मुख्य तपासी अधिकारी रामजित उर्फ महादेव गुप्ता माजी कमांडींग ऑफीसर"ई"परिमंडळ बृहन्मुंबई, राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप शाहू नारकर, भाऊसाहेब परांजपे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती नयना गुळीक,सहकर्म सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ.शितल माणिक पाटील, उर्मिला कदम, राजकुमारी गुप्ता, रुपाली पाटील, शारदा पाटील, रेश्मा कदम, सीमा उपाध्याय,सुरेश कदम, श्रीकुमार नायर, तुकाराम पाटील, पत्रकार संपादक हरी आल्हाट आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या आरोग्याबद्दल (MENSTRUAL HYGIENE) योग्य मार्गदर्शन करणे आणि त्यांना सॅनिटरी नॅपकीन्सची उपलब्धता सुनिश्चित करणे हे होते.यामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याबद्दल जागरुकता वाढविण्यास मदत झाली आणि त्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटले. अनेक विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माणिक पाटील सर,जितू गुप्ता सर, मुख्याध्यापिका नयना गुळीक मॅडम, शितल पाटील मॅडम व इतर सर्वांनी अथक परिश्रम घेतले.

## आषाढी एकादशीच्या निमित्ताने केलेल्या बसच्या व्यवस्थेतून महामंडळाच्या तिजोरीत पडली लाखोंची भर

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**






आषाढी एकादशी किंवा देवशयनी एकादशी हिंदू पंचांगातील महत्त्वाची तिथ आहे. वारकरी संप्रदायातील हा सर्वात मोठा उत्सव आहे. वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे .आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी भक्त पंढरपूर मध्ये विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक येत असतात. याकरता राज्य परिवहन महामंडळातर्फे वारकऱ्यांसाठी ज्यादा गाड्यांची व्यवस्था करण्यात येत असते. राज्यभरातून सर्वत्र एसटी बसची व्यवस्था केलेली असते. विशेष बस फेरी यावेळी देण्यात येत असते.तसेच पंढरपूर येथून पुन्हा घरी परतण्यासाठी देखील वारकऱ्यांना सुविधा दिली जाते. त्यामुळे महामंडळाच्या तिजोरीत लाखोंची भर पडली आहे.

आषाढी एकादशी येईपर्यंत शेतातील पेरणी आटोपलेली असते .व शेतातील कामे वेळेत पूर्ण करून मिळेल त्या वाहनाने पंढरीची वाट वारकरी धरत असतात. कोणी वाहनाने, तर कोणी पायी विठुरायाचे दर्शन घेत असतात. दरवर्षी महामंडळातर्फे विशेष व्यवस्था करण्यात येते. "प्रवाशांच्या सेवेसाठी असे" ब्रीदवाक्य जोपासणारी लाल परी प्रवाशांच्या सेवेसाठी धावत असते. प्रवाशांना आषाढी वारी घडवण्याच्या अनुषंगाने विशेष बस सोडण्यात येत असतात. या बसमधून प्रवाशांना सुखरूप प्रवासाची अनुभूती येते. एस टी महामंडळाचे कर्मचारी पंढरपूरच्या यात्रेदरम्यान अहोरात्र सेवा देताना दिसून येतात. दिवस-रात्र एसटी महामंडळाच्या आगारातून पंढरपूरच्या दिशेने बस रवाना होत असतात.

एस टी महामंडळाने पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी ऑनलाईन आरक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे अनेक भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी एसटी धावल्यामुळे या बसव्यवस्थेचा फायदा महामंडळाच्या तिजोरीत लाखोंची भर पडली आहे.



## संपादकीय

### स्त्री छळाचे 'बाळकडू'

ओडिशा आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये गेल्या १५ दिवसांमध्ये दोन तरुण मुलींच्या बाबतीत घडलेल्या घटना कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत. ओडिशामधील घटनेत बीएड् करणाऱ्या त्या अभागी मुलीचा विभागप्रमुखाकडून सतत छळ होत होता. त्याच्याकडून होणाऱ्या लैंगिक मागण्यांना कंटाळून तिने महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे तक्रारही केली होती. तक्रारीची दखल घेतली गेली नाही तर प्राचार्यांच्या केबिनसमोर आपण जीव देऊ असेही तिने लेखी दिले होते. तिच्या तक्रारीची दखल तर घेतली गेली नाहीच, उलट विभागप्रमुख आणि प्राचार्यांनी संगनमताने तिच्या पाठीशी इतर कोणी उभे राहणार नाहीत, अशीही व्यवस्था केली. आपल्या तक्रारीचा काहीच उपयोग होत नाही, या उद्विग्नतेतून तिने स्वतःवर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घेतले. आत्महत्या हा काही कोणत्याही प्रश्नावर उपाय नाही वगैरे तत्त्वज्ञान यावर झाडले जाईलच, पण एखाद्या मुलीच्या गंभीर तक्रारीची दखलच न घेणे आणि संबंधितांना वाचवणे हा देखील मार्ग नव्हे. एखाद्या जिवावर स्वतःवर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घ्यावे एवढी वेळ येत असेल, तर त्याची त्या काळात किती तगमग झाली असेल या विचारानेच कुणाही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा येईल. लैंगिक छळाची तक्रार करायला आधीच एखादी स्त्री स्वतःहून पुढे येणे किती कठीण असते ते वेगळे सांगायला नको. अशा वेळी तिच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याऐवजी तिलाच आत्महत्या करायला भाग पाडणारी आपली व्यवस्था किती कोडगी आहे, ते दिसते. विशाखा समितीची तरतूद, स्त्रियांच्या बाजूने कायदे असे सगळे असतानाही असे घडते हे आणखी चीड आणणारे. कारण कायदा आपल्यासाठी नाही, आपल्या बाजूने नाही हा यातून जाणारा संदेश तर अशा घटनांना तोंड देणाऱ्या इतर स्त्रियांना आणखी नाउमेद करणारा आहे.

घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांना कसे वागवले जाते ते पाहा, असे म्हणावे तर दुसऱ्या एका घटनेत ओडिशाहून जवळपास १७०० किलोमीटर अंतरावर असलेल्या हरियाणामध्ये वडीलच मुलीचा खून करतात. वडिलांच्याच प्रोत्साहनाने टेनिस या खेळात कारकीर्द घडवलेल्या, टेनिस अकादमी चालवणाऱ्या, गाण्याच्या अल्बममध्ये सहभाग घेणाऱ्या राधिका यादव या गुणी मुलीची कहाणी दुर्दैवी ठरली. ती स्वयंपाकघरात काम करत असताना तिच्यावर तिच्या वडिलांनीच पाठीमागून एक नाही, दोन नाही, तर तब्बल पाच गोळ्या झाडल्या. बापलेकीच्या नात्यातील जिव्हाळा बंदुकीच्या गोळ्यांनी संपवण्याइतके क्रौर्य त्या बापात का निर्माण झाले असावे, याचे प्रथमदर्शनी मिळणारे उत्तर थेट मध्ययुगात नेणारे आणि तरीही आजच्या काळातील पुरुषप्रधान मानसिकतेची परिसीमा दाखवणारे आहे. राधिका यादवला तिच्या वडिलांनीच टेनिस खेळायला प्रोत्साहन दिले. तिचे सामने असत तेव्हा आईवडिलांपैकी कोणी तरी सतत तिच्याबरोबर असे. तिच्या वडिलांनीच तिला टेनिस अकादमी सुरू करायला मदत केली. त्यासाठी दोनेक कोटी रुपये खर्च केले असेही वृत्त आहे. भाडेतत्त्वावर दिलेल्या घरांमधून तिच्या वडिलांना चांगले उत्पन्न येत असे. तरीही 'मुलगी कमावते आणि तिच्या पैशांवर तू जगतोस' अशी शेरेबाजी गावात कुणी तरी केल्यावर या दीपक यादव नावाच्या इसमाचा अहंकार दुखावला आणि त्याने 'टेनिस अकादमी बंद करून टाक' असा लकडा मुलीमागे लावला. या गोष्टीला राधिका तयार नव्हती आणि त्यामुळे तिच्या वडिलांनी तिचा गोळ्या घालून खून केला असे म्हटले जात आहे. राधिकाचा मोकळा वावर, ती करत असलेले रील्स यावरही तिच्या वडिलांचा आक्षेप होता आणि त्या सगळ्या रागातून त्यांनी हे अत्यंत हिंस्त्रा पाऊल उचलले असे सांगितले जात आहे.

ओडिशा असो की हरियाणा, घर असो की दार, सगळीकडे पुरुषांची मानसिकता एकाच प्रकारची का आहे? आपल्याच प्रोत्साहनाने आपली लेक काही तरी करू पाहत असेल तर तिच्याभोवती आपल्या भक्कम आधाराचे संरक्षक कवच उभारावे असे या बापाला का वाटले नसेल? 'तुम्हीही तुमच्या मुलीला असेच उभे करा', असे टीकाकारांना ठामपणे का सांगता आले नसेल? लोक दोन्ही बाजूंनी बोलतात, तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेच बरे असे का वाटले नसेल? आपली मुलगी, बहीण, बायको यांनी आर्थिकदृष्ट्या आपापल्या पायांवर ठाम उभे असलेच पाहिजे, वेळ पडली तर आपल्याशिवायही त्यांना नीट जगता आले पाहिजे, असे अशा पुरुषांना का वाटत नाही? महत्त्वाकांक्षेचे पंख लेऊन आपल्या घरातली कोणीही स्त्री उडू पाहत असेल तर त्या पंखांना बळ द्यायचे, भक्कमपणे पाठीशी उभे राहायचे की ते पंखच छाटून टाकायचे? कुणी तरी उठून टीका करते तर त्या टीका करणाऱ्याला त्याची जागा दाखवायची की आपल्याच लेकीचा जीव घ्यायचा? मुळात बायको, मुलगी, बहीण यांच्या कमाईवर एखाद्या पुरुषाला कधी तरी जगावे लागले तर ते त्याला किंवा इतरांना इतके टोचावे ते का? खरे तर ते टोचणे सोयीनुसारच असते. बायकोच्या कमाईवर बिनदिक्कतपणे हक्क सांगत, उलट तिलाच न्यूनगंड देणाऱ्या पुरुषांची समाजात कमतरता नाही. पण इथे आपल्याकडे पैसा असतानाही आपल्याला 'मुलीच्या पैशावर जगतोस' असे हिणवले जाते, हा राग. म्हणजे पुन्हा अहंकाराला धक्काच. आदर्श राजा ठरण्याच्या नादात कुणाच्या तरी टीकेमुळे आपल्या गर्भवती पत्नीचा 'त्याग' करण्याच्या वृत्तीपेक्षा तो फारसा वेगळा नाही. काहीही झाले की त्याला धार्मिक वळण द्यायचे हा आपल्याकडचा अलीकडच्या काळातला आवडता छंद. राधिका यादवने इनाम उल हक या गायकाच्या 'कारवाँ' या अल्बममध्ये सहभाग घेतला होता. तसा एक व्हिडीओही तिच्या इन्स्टाग्राम खात्यावर आहे. या सुतावरून स्वर्ग गाठत हे 'लव्ह जिहाद'चे प्रकरण असल्याचाही दावा केला. पण दीपक यादवची कबुली आणि राधिका यादवच्या मित्रमंडळींची विधाने यामुळे तो वेळीच फेटाळून लावला गेला.

ओडिशामधली जळीत मुलगी असो की राधिका यादव, ही दोन्ही प्रकरणे आजच्या मुलींच्या महत्त्वाकांक्षा समजून न घेता आपला पुरुषप्रधान अहंकार कुरवाळत बसणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात. एका प्रकरणात शैक्षणिक महत्त्वाकांक्षा बाळगणारी मुलगी लैंगिक मागण्यांना नकार देते म्हणून तिला आत्महत्येच्या पायरीपर्यंत जाणे भाग पाडले जाते तर दुसऱ्या प्रकरणात करिअर करू पाहणारी मुलगी बापाच्या प्रतिष्ठेआड येते म्हणून जिवानिशी संपवली जाते. म्हणजे इच्छा, आकांक्षा, भावना, अहंकार हे सगळे आहे ते फक्त पुरुषांनाच. त्याला धक्का लावणारी स्त्री ओडिशामध्ये असो, हरियाणामध्ये असो, पश्चिम बंगालमध्ये असो की कर्नाटकात असो देशाच्या कोणत्याही भागात तिच्या वाट्याला हेच प्राक्तन येते. पुरुषांनी कसे मर्द असले पाहिजे, पुरुषासारखे वागले पाहिजे, घरातल्या बाईच्या तालावर नाचता कामा नये, प्रत्येक बाबतीत स्त्रीपेक्षा वरचढच असले पाहिजे हे त्याला अगदी लहानपणापासून जे 'बाळकडू' दिले जाते, ते हळूहळू स्त्रीपुरुष संबंधांमधले कडू जहर बनून जाते. या वातावरणात वाढणारे पुरुष स्त्रीचा माणूस म्हणून कधीच विचार करू शकत नाहीत. त्यांना त्यांच्या आसपास हवी असते ती त्यांच्या अंकित बनून राहायला तयार असणारी स्त्री. तशी ती असेलच असे नाही, म्हणून मग ती नकोच. तिने करिअर, नोकरी, व्यवसाय काहीही करायचे की नाही हा निर्णय तिचा नसतो. लग्न केले तर मूल व्हावे की नाही, हा निर्णय तिचा नसतो. हुंड्यासाठी तिला कधी मारून टाकले जाईल याचा नेम नसतो. गृहिणी म्हणून ती वावरत असेल तर तिच्या घरकामाला काडीची किंमत नसते. एकूण काय, तर तिने महत्त्वाकांक्षी असण्यापेक्षा जिवानिशी गेलेले बरे.

# टेंभी ग्रामपंचायत निधी गैरवापर प्रकरणात चौकशीस विलंब; तक्रारदाराची नाराजी




**दैनिक युवक आधार -**
**पांढरकवडा (तालुका प्रतिनिधी)** – टेंभी ग्रामपंचायत अधिकारी पूजा मामीडवार यांच्यावर शासकीय निधीच्या गैरवापराचे गंभीर आरोप करण्यात आले असूनही, संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप चौकशी प्रक्रिया सुरू झालेली नाही. यामुळे तक्रारदार विलास नारायण धुर्वे यांच्यासह गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे.

विलास धुर्वे यांनी जिल्हा परिषद, यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल केली असून, त्यामध्ये त्यांनी २०२०-२१ पासून ३१ मार्च २०२५ या कालावधीत ५% अबंध निधी (पेसा), पंधरावा वित्त आयोग, सामान्य निधी, पाणीपुरवठा योजना व इतर शासकीय योजनांमध्ये झालेल्या निधीच्या गैरवापराबाबत सविस्तर माहिती दिली आहे. सदर तक्रारीनंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून पंचायत समिती पांढरकवडा यांना चौकशीसाठी अधिकृत पत्र प्राप्त झाले आहे. मात्र अजून चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली नाही. टेंभी हे गाव आदिवासी बहुल असून, पेसा क्षेत्रात मोडते. त्यामुळे शासकीय निधीचा वापर अत्यंत पारदर्शक व प्रभावी पद्धतीने होणे आवश्यक असताना, येथे सातत्याने अनियमितता होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

"चौकशी प्रक्रिया विलंबित केल्यामुळे दोषींवर कारवाई लांबणीवर पडत आहे. यामुळे भ्रष्टाचाराला उत्तेजन मिळत असून, चौकशीस विलंब होणे हे चुकीचे आहे असे तक्रारदार विलास धुर्वे यांनी सांगितले.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पंचायत समिती पांढरकवडा व जिल्हा परिषद प्रशासन याकडे गंभीरपणे लक्ष देईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

टेंभी ग्रामपंचायतीचे प्रकरण विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्याकडे फॉरवर्ड केले आहे. सध्या त्यांच्या हाती इतर चौकशी सुरू असल्याने पुढच्या आठवड्यात टेंभी प्रकरणाची चौकशी सुरू केली जाईल.

**(गट विकास अधिकारी, पांढरकवडा)**

======================

सदर चौकशीबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. नमुना ८ व नमुना ९ चे काम सुरु आहे. त्यामुळे काम थोडक्यात पेंडिंग आहे. मात्र, लवकरच टेंभी ग्रामपंचायतीच्या चौकशीला सुरुवात होईल.

**(विस्तार अधिकारी (पंचायत) पांढरकवडा)**

# कोल्हापूर येथे कवि सरकार इंगळी वाढदिवसानिमित्य यशवंत कविसंमेलन संपन्न



**दैनिक युवक आधार**
**हातकणंगले वार्ताहर:** कवि सरकार इंगळी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय यशवंत कवि संमेलन व पुरस्कार सोहळा रविवार २० जुलै २५ रोजी सकाळी १०.३० वा . करवीर वाचन मंदिर भवानी मंडप जवळ कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता सदर कविसंमेलन अध्यक्षा म्हणून ह . भ . प . सौ विनाताई वैभव महाडीक कळंबणी खेड ( कवयित्री ) या लाभल्या होत्या त्यांनी आपल्या भाषणात साहित्यिक यांनी आपले लेखनात समाजप्रबोधन असे लेखन करावे असे आवाहन केले . तर उद्घाटक
मा बाळासाहेब तोरस्कर ठाणे
**(जेष्ठ लेखक पत्रकार** ) यांनी मराठी भाषेचा प्राधान्याने प्रथम वापर केला पाहिजे . असे सांगितले तसेच प्रतिमा पुजन
मा अनंत तुलाजी करजवकर भरणे ता खेड यांनी केले . त्यांनी आपल्या भाषणात विविध पैलू सांगितले आणि प्रमुख पाहुणे प्रा किसनराव कुऱ्हाडे यांनी मार्गदर्शन करताना आपल्या विनोदी शैलीत मार्गदर्शन केले

तसेच पुस्तक प्रकाशन हस्ते डॉ श्रीकांत पाटील घुणकी( प्रसिद्ध कांदबरीकार लेखक ) यांचे हस्ते करण्यात आले त्यांनी साहित्यातील अनेक प्रकारचे लेखनाविषयी माहिती दिली . तर स्वागताध्य कवि भाऊसो कांबळे ममदापूर यांनी केले . संमेलनात मला भावलेले कवि सरकार व त्यांचे कार्य (संपादक मंडळ ) आणि
**प्रेमभंग ( काव्यसंग्रह )**
कवयित्री सरोजा गायकवाड शिरूर अनंतपाळ लातूर व सौ आरती लाटणे यांच्या कानमंत्र आदि पुस्तकांचे प्रकाशन करणेत आले .

सदर कवि संमेलनात सोलापूर धाराशिव परमणी रत्नागिरी जळगाव बेळगाव सातारा कोल्हापूर आदी जिल्ह्यांतील कवि सहभागी झाले होते शेवटी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्रचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या नावे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . असे पत्रक कवि सरकार वाढदिवस कमिटीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहे .

# मा.शत्रुघ्न घाडगे यांची ग्राहक पंचायत तालुका अध्यक्षपदी निवड



**दैनिक युवक आधार**
**सणसर:** विकास क्षत्रिय जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांचे प्रांत व विभागीय अभ्यासवर्ग शनिवार दि १९ जुलै २०२५ वडुज ता खटाव जि सातारा येथे संपन्न झाला.यावेळी सपकळवाडी गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य शत्रुघ्न तुकाराम घाडगे यांची इंदापुर तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली घाडगे यांनी आदीपासूनच ग्राहक पंचायत संघटनेमध्ये काम करत असल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली. विभागीय अभ्यासवर्गा प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर घाडगे यांना निवडीचे पत्र दिलीप पाटील अध्यक्ष जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते देण्यात आले.यावेळी दिलीप फडके संघटक जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना महाराष्ट्र दिलीप निंबाळकर अध्यक्ष जागृत ग्राहकराजा संघटना पुणे जिल्हा,नितीन मिंडे संघटक पुणे जिल्हा, संतोष शिंके सचिव पुणे जिल्हा आणि पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# वैनतेय विदयालय येथे डॉ.गायत्री सानप यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
निफाड येथील साई हॉस्पिटलचे डॉ. राम सानप यांची सुकन्या डॉ. गायत्री सानप यांची एम डी एस (कोनसर्वेटिव्ह डेन्टिस्त्री अँड इंडोडोतीनिस ) साठी देशातील नामांकित कॉलेज डॉ डी वाय पाटील डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल पुणे युनिर्व्हर्सिटी मध्ये पहिल्याच राउंड मध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला. डॉ.गायत्री या निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनी आहेत. या प्रवेशा बद्दल वैनतेय विद्यालयात डॉ.गायत्री यांचा संस्थेचे विश्वस्त वि दा व्यवहारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी विश्वस्त मधुकर राऊत,विश्वास कराड मुख्याध्यापिका गुजराथी मॅडम आदी उपस्थित होते.यावेळी डॉ.गायत्री यांनी वैनतेय विद्यालयात 10 वि पर्यंत शिक्षक घेतले त्याचा खूप फायदा झाला असे सांगितले.

डॉ.गायत्री यांनी नीट पीजी परीक्षेत एअर 2501राज्य रँकमध्ये 1008 स्थान मिळवले. त्यांचे बी डी एस प्रवरा एज्युकेशन लोणी येथे झाले असून निफाड उपजिल्हा रुग्णालयात काही कालावधीसाठी दंततज्ञ म्हणून मोफत सेवा देखील केली.त्यांचे निफाड डॉक्टर असोसिएशन व मित्र परिवाराकडून कौतुक होत आहे.



# नांदेडमध्ये भारतातील पहिले किन्नर भवन उभारणार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



राज्यसभा खासदार डॉ अजित गोपछेडे यांच्या माध्यमातून तृतीयपंथीय भगिनींसाठी सन्मानपूर्वक आयुष्याची दिशा समाजातील तृतीयपंथीय हा एक दुर्लक्षित आणि वंचित घटक आहे. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना सन्मानाची व प्रतिष्ठेची वागणूक मिळावी यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे. याच दृष्टीने नांदेड शहरालगतच्या म्हाळजा कामठा परिसरात साडेतीन एकर जागेवर किन्नर भवन उभारण्यात येणार आहे. या अनुषंगाने आज मी स्वत समाजकल्याण विभागाचे अधिकारी आणि प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांसह प्रस्तावित जागेची पाहणी केली. तृतीयपंथीयांचे जीवन अनेकदा हालअपेष्टांनी भरलेले असते. समाजातील मुख्य प्रवाहापासून ते दूर राहतात. त्यामुळे त्यांच्या जीवनात सन्मान सुरक्षितता आणि स्थैर्य यावं, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने तृतीयपंथीयांसाठी गरीमागृह सारख्या अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत. त्याच धर्तीवर नांदेडमध्ये उभारण्यात येणारे हे 'किन्नर भवन' एक अभिनव उपक्रम ठरणार आहे. या किन्नर भवनात निवास व्यवस्था, स्मशानभूमी, वैद्यकीय व सामाजिक सुविधा, प्रशिक्षण आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत हा प्रकल्प तृतीयपंथीय समाजाच्या पुनर्वसनासाठी आणि सशक्तीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत किन्नर समुदायाला शुभ मानतात मंगल प्रसंगी, विवाह, बारसे, शुभारंभ, प्रसंगी त्यांचे आगमन उपस्थिती शुभ मानली जाते, किन्नर कलेचे उपासक आहेत, त्यांना अर्धनारी नटेश्वर संबोधले जाते, त्यांच्या मध्ये शिवपार्वती चा निवास असतो असे मानले जाते युद्धाला जाण्यापूर्वी त्यांच्या कडून औक्षण केले जाणे ही विजयासाठी पूरक शुभ मानले जात असे अशा शुभशकुनी समूहाच्या उन्नती साठी एका ध्येयवादी प्रेरणेतून, नांदेड समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे, तहसीलदार संजय वारकड, कमल फाउंडेशनचे सचिव अमरदीप गोधणे, तसेच किन्नर समाजातील मान्यवर रणजीता बकस, गुरु फरिदा बकस, अर्चना बकस, जया बकस, बिजली बकस, इत्यादी उपस्थित होते. माझे स्पष्ट मत आहे की समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे

तृतीयपंथीयांसाठी उभारण्यात येणारे हे किन्नर भवन केवळ एका इमारतीचा प्रकल्प नसून त्यांच्या आयुष्यात आशा आत्मसन्मान आणि नवजीवनाचा एक आधारस्तंभ ठरणार आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## भाजपा युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी शुभम अन्वीकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**



**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर :-** तालुक्यातील अन्वी येथील शुभम अन्वीकर यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ते पक्षात गेल्या अनेक वर्षापासून काम करीत आहे. गावचे सरपंच पद देखील त्यांनी भूषवले असून तालुक्यात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षाकडून त्यांची ही निवड करण्यात आली आहे. तालुक्यात त्यांचा जनसंपर्क पाहता आगामी निवडणुकीत पक्षाला त्याचा फायदा होणार आहे. या निवडीबद्दल पक्षाचे राज्य परिषद सदस्य सुरेश बनकर, अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर मोठे, जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, भवन-पालोद गटाचे मंडळ प्रमुख एकनाथ हिवाळे, दत्ता बडक, अनिल बनकर, भाऊसाहेब उबाळे आदींनी अभिनंदन केले आहे.

## संत शिरोमणि सावता महाराज संजीवन समाधी सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा करावा – योगेश भैय्या जाधव यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजी नगर(प्रतिनिधी)** – संत शिरोमणि सावता महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा दिनांक २३ जुलै २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा होणार असून, हा सोहळा अधिकाधिक श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्याचे आवाहन सावता भक्त योगेश भैय्या जाधव (युवक जिल्हाध्यक्ष, सावता परिषद जालना व संस्थापक अध्यक्ष, मंथुराबाई जाधव फाउंडेशन, सेलगाव) यांनी केले आहे. सावता महाराजांनी प्रभू पांडुरंगाच्या साक्षीने सूर्य उगमाच्या वेळेस संजीवन समाधी घेतली होती. त्यामुळे हा सोहळा प्रत्यक्ष पहाटे ५ ते ६ वाजेच्या दरम्यान साजरा करण्याची परंपरा आहे. तथापि, भक्तांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी हा सोहळा दुपारी १२ वाजता साजरा केला जातो, याचीही नोंद योगेश भैय्यांनी घेतली आहे. संत सावता महाराज यांच्या समाधी सोहळ्याला 'पुण्यतिथी' म्हणणे चुकीचे असून, सर्व कार्यक्रमांत 'संजीवन समाधी सोहळा' असा उल्लेख करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. "उठोनि प्रतकाळी प्रणायाम साधिला..." या अभंगाच्या माध्यमातून संत सावता महाराजांच्या समाधी वेळेचा संदर्भ दिला जातो. हा सोहळा केवळ परंपरा म्हणून नव्हे तर संतांच्या कार्याची, विचारांची आठवण करून देणारा आहे. त्यामुळे राज्यभरातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, आणि आपल्या गावात, संस्थांमध्ये, मंदिरांमध्ये हा संजीवन समाधी सोहळा साजरा करावा, असे आवाहन योगेश भैय्या जाधव यांनी केले आहे.

# माणगांव तालुक्यातील सर्व शालेय परिवहन समितीची प्रथम सभा

## माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल येथे संपन्न...

**दैनिक युवक आधार**

**माणगांव रायगड प्रतिनिधी :-सचिन पवार**

माणगांव :- शासन परिपत्रक नियम क्र. ५(२) मधील तरतुदी नुसार शालेय मुलाची ने आण सुरक्षिपणे करणे याकरिता प्रथम सभेचे आयोजन माणगांव तालुक्यातील सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मेडीयम स्कूल कचेरी रोड माणगांव येथे आयोजित केली होती यावेळी उप प्रादेशिक परिवहन पेण चे मोटार वाहन निरीक्षक सूर्यकांत गंभीर, सहाय्यक मोटार निरीक्षक नंदन राऊत, सहाय्यक मोटार निरीक्षक युवराज उकले, माणगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, माणगांव वाहतूक शाखेच्या प्रतिनिधी विमल ठाकूर मॅडम, माणगांव शिक्षण प्रतिनिधी शिंदे, शिपूरकर स्कूल च्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे मॅडम, सर्व शालेय समितीचे अध्यक्ष, पालक प्रतिनिधी, स्कूल बस चालक मालक, स्कूल बस मदतनीस व पत्रकार सचिन पवार या बैठकी करिता उपस्थित होते यावेळी प्रथम सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल च्या मुख्याध्यापिका मनिषा मोरे मॅडम यांनी माणगांव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे साहेब, मोटार वाहन निरीक्षक सूर्यकांत गंभीर साहेब, मोटर वाहन सहाय्यक निरीक्षक नंदन राऊत व मोटार वाहन सहाय्यक निरीक्षक युवराज उकले साहेब यांच पुष्पगुछ देऊन स्वागत केले. व पुढील कार्यक्रमाला सुरुवात केली यावेळी मोटार वाहन सहाय्यक निरीक्षक युवराज उकले



व नंदन राऊत यांनी स्कूल समिती 2025/26 याकरिता शालेय मुलाची ने आण सुरक्षित पणे करणे याकरिता मोलाचे मार्गदर्शन दिले. महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये शालेय विद्यार्थी परिवहन हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. परिवहन व्यवस्थेला शिस्त व दिशा प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग व परिवहन विभागाने काही नियमावली निश्चित करून महाराष्ट्रातील सर्व शालेय परिवहनासाठी लागू करण्याचा निर्णय घेतला. शालेय परिवहन समिती जिल्हा स्तर महानगरपालिका स्तर व शालेय स्तरावर गठीत करण्याचा निर्णय यांच परिपत्रकद्वारे घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने विदयार्थ्यांची सुरक्षितता व सुरक्षित वाहतूक व्यवस्था नियंत्रित ठेवण्यासाठी शालेय परिवहन समिती असणे बंधनकारक करण्यात आली आहे. या समिती संघटनाचा उद्देश विद्यार्थ्यांची ने आण सुरक्षित करणे अवैध वाहतुकीवर आळा बसविणे व वाहतूक नियमाचे उल्लंघन टाळणे याबरोबर शालेय परिवहन समितीची कार्य मुलांना समुपदेशन व सुरक्षा जागृती करणे शाळेतील मुलांना दररोज सुरक्षितपणे ने आण करणे बस थांबे, वाहनाची कागदपत्रे नोंदणी प्रमाणपत्र वय विमा परवाना वायू प्रदूषण, नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालवण्याचा परवाना,चालक मदतनीस, प्रथमोचार पेटी इत्यादी बाबी तपासणे व मगच अश्या वाहनास परवानगी ची शिफारस करणे या सर्व बाबीवर अतिशय सूक्ष्मनिरीक्षण ठेवण्यासाठी मार्गदर्शक म्हणून या समितीचे असणे खूप आवश्यक आहे.

## राजिप मा. सदस्य विलास शेठ फडके यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल ग्रामीण भागातील शाळांना मोफत वह्या वाटप...

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य विलास शेठ फडके यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दिनांक 28 जुलै रोजी जिल्हा परिषद शाळा केवाळे, सुधागड विद्यालय केवाळे जिल्हा परिषद शाळा हरिग्राम, जिल्हा परिषद शाळा करवलीवाडी तसेच दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळा शिवनसई- आंबे,चिंचवली, दूंदरे धुंदरेपाडा, दूंदरे, रिटघर आणि भैरवदेव विद्यालय रिटघर , आदी शाळेंना मान्यवरांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आल्या उपस्थित मान्यवरांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले यावेळी सुभाष शेठ भोपी व विलास फडके आणि मान्यवारांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले



यावेळी उपस्थित मान्यवर दूंदरे ग्रामपंचायत सरपंच सुभाष शेठ भोपी, क्रांतिकारी सेवा संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष नामदेव शेठ फडके,रायगड जिल्हा बँकेचे संचालक संतोष पाटील, शेखर शेळके क्रांतिकारी सेवा संघाचे नरेंद्र भोपी रायगड भूषण मा सरपंच भारत भोपी दिलीप उलवेकर विश्वास पाटील रायगड भूषण महादेव गायकर, शुभम सिनारे,सदस्य महेश पाटील शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते

## रेखा तौर यांनी असंख्य महिलासह आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश

**दैनिक युवक आधार**

जालना प्रतिनिधी (शहर) संतोष राहवे.

याप्रसंगी पक्षप्रवेशकर्त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आपल्या हातून शिवसेना पक्ष वाढीचे व सामान्य जनतेच्या सेवेचे कार्य करावे असे आवाहन केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,



शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, मेघराज चौधरी, रेखा तौर ,लता जोशी ,कविता दाभाडे, गंगा काळे , सविता सिरसागर, उषा नाटकर, दीपाली नाईकवाडे , पर्वाता भुसारे, नंदा गवई ,अशोक काळे, सागर पाटोले, प्रदीप पवार, विजय सावळे ,बद्रि मस्के, ओमराजे तौर ,शैलेश बाहोती, रेखा जोशी, आदीचा शिवसेनेत प्रवेश झाला.

**शिवसेना_पक्ष_प्रवेश_सोहळा**

## माणुसकी फाउंडेशन व ॲग्रो केअर कृषी मंचाच्या वतीने मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्काराचे वितरण

### राज्याच्या सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा मुबलक वीज उपलब्ध होणार - मंत्री छगन भुजबळ

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

माणुसकी फाउंडेशन आणि अग्रो केअर कृषी मंचाच्या वतीने आयोजित कृषी पुरस्कार कार्यक्रम नक्षत्र हॉल निफाड येथे पार पडला. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्य शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज ही अतिशय महत्वाची असल्याने दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी सौर कृषि पंप योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची अतिशय यशस्वीपणे राबविण्यात येत असून लवकरच शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होईल असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, शिवाजीराव ढेपले,राजाभाऊ शेलार, प्रांत



अधिकारी शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी, बाळासाहेब पुंड, दत्ताकाका रायते, अशोक नागरे, सुरेखा नागरे, सुवर्णा पगार, सुमनताई शेलार, पांडुरंग राऊत, राहुल डुंबरे, अग्रो केअर कृषी मंचचे अध्यक्ष भूषण निकम, माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष सागर निकाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी कृषि क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांच्या स्मृतीस अभिवादन करत मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, येवला, निफाडसह परिसरात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादक शेतकरी आहे. यामध्ये लासलगाव येथे आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ आहे. मात्र अनेकदा कांद्याला भाव न मिळाल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत येतात. त्यामुळे कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देऊन शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळण्यासाठी येवला तालुक्यातील चिचोंडी औद्योगिक वसाहतीत ५० एकर जागा कांदा उद्योगासाठी आरक्षित करण्यात आली असून लवकरच हा प्रकल्प सुरू होईल अशी माहिती त्यांनी दिली. ते म्हणाले की, कृषिप्रधान देशाची खरी ताकद हा शेतकरी बांधव आहे. आपण सर्वजण जाणतो की, भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशात अजूनही बहुतांश लोकांचे जीवन शेतीवर आधारित आहे. शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. बदलत्या हवामानाचा फटका, बाजारातील अस्थिरता, योग्य दर न मिळणे यामुळे शतकरी वर्ग अडचणीत आहे. अशा कठीण परिस्थितीत अग्रोकेअर कृषी मंच सारखी संस्था शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाते. ही कौतुकास्पद बाब आहे. ते म्हणाले की संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीचं प्रशिक्षण, सेंद्रिय शेतीचं प्रोत्साहन, मार्गदर्शन, तालुका व जिल्हास्तरीय प्रेरणादायक शेतकऱ्यांचा सन्मान, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण, गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, महिलांसाठी प्रशिक्षण असे विविध कार्यक्षेत्र हाताळणं ही खरोखरच विलक्षण गोष्ट आहे. त्याचबरोबर पत्रकार सागर निकाळे यांच्या माणुसकी फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम नियमित राबविले जात आहे. या संस्थेचे काम देखील कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजीराव ढेपले, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, अग्रो केअर कृषी मंचचे अध्यक्ष भूषण निकम, माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष सागर निकाळे यांच्यासह मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## शाळा आंदोशीचा नक्ष पाटील स्कॉलरशिप परीक्षेत अलिबाग तालुक्यात प्रथम; ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश



**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा**

आंदोशी गाव ग्रामीण भागात शिक्षणासाठी मर्यादित सुविधा असूनही अपार कष्ट, जिद्द आणि अभ्यासाच्या जोरावर यश मिळवता येते, याचे जिवंत उदाहरण ठरला आहे रायगड जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा आंदोशीचा (ता. अलिबाग)विद्यार्थी कु. नक्ष कैलास पाटील. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत नक्षने तब्बल ८३% गुण मिळवत अलिबाग तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे केंद्रप्रमुख मा. कृष्णकुमार शेळके सर, शाळेचे मुख्याध्यापक, व केंद्रातील शिक्षकवर्गाने त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.नक्षचा शैक्षणिक प्रवास यथार्थ प्रेरणादायी ठरतो. त्याने केंद्र शासनाच्या नवोदय विद्यालय (निजामपूर, ता. माणगाव) येथे सहावीच्या प्रवेश परीक्षेत प्रथम श्रेणीत यश मिळवले असून सध्या तो नवोदय विद्यालयातच इयत्ता ६ वी मध्ये शिक्षण घेत आहे. त्याच्या या सातत्यपूर्ण यशामुळे पूर्ण अलिबाग तालुक्यातून त्याचे कौतुक होत आहे. हा उज्ज्वल यशाचा ध्वज ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक दीपस्तंभ ठरत आहे. नक्षच्या यशाने इतर विद्यार्थ्यांमध्येही अभ्यासाची गोडी निर्माण होईल, अशी आशा शिक्षक व पालक वर्ग व्यक्त करत आहेत."हिम्मत असेल, चिकाटी असेल आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील मोठ्या संधी मिळवू शकतात," हे नक्षने सिद्ध केले आहे.

# सत्यसोधक कर्मवीर गणपत दादा मोरे फुले शाहू विचारांचे पाईक :- भारत जाधव ( मराठी भाषा अनुवादक, मराठी भाषा विभाग, मंत्रालय मुंबई ) यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

कर्मवीर गणपत दादा मोरे यांनी महात्मा ज्योतिराव फुले आणि राजश्री शाहू महाराज यांचा सत्यशोधकीय विचार नाशिक जिल्ह्यामध्ये रुजविण्याचे काम केले. सत्यशोधकीय जलशाच्या माध्यमातून गाव, खेड्यामध्ये जनजागृती करून अज्ञान आणि अंधकारमय समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यासोबतच आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने उदाजी मराठा बोर्डिंग च्या रूपाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. कर्मवीर गणपत दादा मोरे यांनी आईच्या रूपाने या समाजाचे सेवा केली. असे प्रतिपादन श्री भारत जाधव (भाषा अनुवादक मराठी भाषा विभाग, मंत्रालय मुंबई) यांनी केले. कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे आयोजित केलेल्या कर्मवीर गणपत दादा मोरे पुण्यस्थिती कार्यक्रम प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका श्रीमती शोभाताई भागवत बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेर्ले,सौ मंजीरीताई कुंदे,रवींद्र मोरे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, यांच्यासह महविद्यालय विकास समिती, शालेय समिती सदस्य उपस्थित होते. श्री भारत जाधव पुढे म्हणाले कि, मराठा विद्या प्रसारक समाजाच्या स्थापनेतून शिक्षणाचा प्रसार शहरापासून गावकुसाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य कर्मवीरांनी केले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेत आज मविप्र समाज व त्याचे सर्व घटक कार्य करीत आहे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब असून शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून प्रगती करताना समाजाने आणि विद्यार्थांनी कर्मवीरांचे कार्य आणि स्मरण करीत यशस्वी जीवनाची वाटचाल करताना, समाजमूल्ये, जीवनमूल्ये आणि विचारमूल्ये यांचे जतन करावे. कर्मवीर गणपत दादा मोरे यांनी शैक्षणिक



**निफाड : कर्मवीर गणपत दादा मोरे पुण्यस्थिती प्रसंगी मार्गदर्शन करताना भारत जाधव ( मराठी भाषा अनुवादक, मराठी भाषा विभाग, मंत्रालय मुंबई ) व्यासपीठावर मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका श्रीमती शोभाताई भागवत बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेर्ले,सौ मंजीरीताई कुंदे,रवींद्र मोरे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे,**

उन्नतीबरोबरच सत्यशोधकी विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करीत समाजप्रबोधन केले, यातून समाजाला प्रगतीच्या दिशा मिळाल्या. त्यामुळे गणपत दादांचे कार्य स्मरणात ठेवीत त्यांचे नेतृत्व, समंजसपणा आणि लढावू वृत्ती या गुणांचा अंगीकार करून विद्यार्थ्यांनी किमान आपण एक चांगला व्यक्ती बनण्याचा प्रयत्न सोडू नये अध्यक्षीय विचार व्यक्त करताना मविप्र सभापती बाळासाहेब श्रीरसागर म्हणाले, " मविप्र समाज ही संस्था कर्मवीरांचे कार्य आणि विचार यांना अनुसरून कार्य करीत आहे. त्यांनी समाज उन्नतीसाठी निश्चित केलेले ध्येय आज पूर्ण होत असताना आपले सर्वांचे योगदान निश्चित मोलाचे आहे. मविप्र समाजाचे प्रगतशिल आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या रूपाने कर्मवीरांनी निर्माण केलेल्या कार्यांचे फलित आज जगभर दिसत आहे. विद्यार्थ्यांनी मविप्रच्या माध्यमातून शिक्षण घेत प्रगती करण्याबरोबर कर्मवीरांचे ध्येय आणि कार्य समाजाच्या दृष्टीस आणावे, आजचे सुप्रसिद्ध व्याख्याते भारत जाधव हे मविप्र संस्थेचे माजी विद्यार्थी आहे. आज अश्या माजी विद्यार्थी रूपाने निश्चितच मविप्रचा ब्रँड महाराष्ट्रभर संस्थेचा नावलौकिक वाढवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मविप्र उपाध्यक्ष मा. विश्वासराव मोरे म्हणाले, कर्मवीर गणपत दादा मोरे यांचे कार्य शेती, शिक्षण, बहुजन समाजाचे कल्याण, शेतक-यांचे प्रश्न सोडविणे, महिला शिक्षण याबरोबर समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. मविप्र समाजाच्या योगदानात गणपत दादा यांच्या धर्मपत्नी शारदामाईचे काम देखील विसरू नये. त्यांच्या कार्यचे स्मरण करीत त्यांच्या विचारांना अनुसरण्याची गरज असल्याचे सांगितले. उपसभापती देवराम मोगल म्हणाले," निफाड तालुक्यातील कर्मवीर गणपत दादा मोरे यांच्या सारख्या आदर्श आणि दिशादर्शक समाजसुधारक आणि सत्यशोधक विचारवंतामुळे समाजाला दिशा मिळाली. शिक्षणापासून वंचित असणा-यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे केलेल कार्य सर्वांना प्रेरणा देणारे आहे. शिक्षणाबरोबर समाजाची इतर क्षेत्रात उन्नती व्हावी,प्रबोधन करावे यासाठी केलेले कार्य कायम स्मरणात असावेत." संचालक शिवाजी गडाख म्हणाले, मविप्रच्या माध्यमातून कर्मवीरांनी समाजिक ऐक्य निर्माण केले. आज नासिक शहराचा आणि जिल्हयाचा विकासात मविप्र समाजाचे योगदान मानले जात आहे. यात कर्मवीर गणपत दादा मोरे यांचे महत्वपूर्ण योगदान आहे."

**कार्यक्रमाची सुरूवात कर्मवीर गणपत दादा मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले, कर्मवीर गणपत दादा मोरे यांनी आपल्या शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक परीवर्तन व्हावे यासाठी सत्यशोधक विचारांची प्रेरणी केली. या कार्यक्रमास माधवराव गीते, अशोक कुंदे, रमेश जाधव, जानकीराम धारराव, अँड. प्रवीण ठाकरे, अशोक वडघुले, श्याम शिंदे, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, सचिन धारराव, योगेश कुंदे, वसंत कापसे, चंद्रकांत कुशारे, मुख्याध्यापिका श्रीमती स्नेहल जाधव तसेच सभासद प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार डॉ. प्रवीण ढेपले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीततेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापक शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व दिवंगत पदाधिकाऱ्यांचा स्मृती जागर कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गो म वेदक विद्यामंदिर, प्राथमिक विद्यामंदिर व डॉक्टर प्र म जोशी प्रशाला पन्हेळी - गायमुख यांच्या संयुक्त विद्यमाने १९ जुलै २०२५ रोजी श्री श्रीकृष्ण प्रभाकर देशमुख यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून संस्थेच्या सर्व दिवंगत पदाधिकाऱ्यांचा जागर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, वरिष्ठ महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री सुनील कुळकर्णी, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री महादेव बैकर, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे, श्री सचिन भाटे, पत्रकार श्री किशोर पितळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला दिवंगत पदाधिकाऱ्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पत्रकार पुरुषोत्तम



मुळे, सचिव मंगेशशेठ देशमुख यांनी स्वर्गीय प्रभाकर देशमुख, स्वर्गीय द मा तळेगावकर, स्वर्गीय डॉ शृंगारपुरे, स्वर्गीय म ग जोशी, स्वर्गीय प अ मेकडे, स्वर्गीय डॉ प्रभाकर जोशी, स्वर्गीय ना द दलाल, स्वर्गीय नारायणराव मेकडे, स्वर्गीय प्रभाकर देशमुख, स्वर्गीय मुकुंद मुळे, स्वर्गीय अड विद्याधर धामणकर, स्वर्गीय भालचंद्र सप्रे, स्वर्गीय प्रकाश पटेल, स्वर्गीय महिपतबुवा गोळे, स्वर्गीय बाळशेठ लोखंडे, स्वर्गीय श ग टिळक, स्वर्गीय विनय देशमुख, स्वर्गीय भाई पिसाट, स्वर्गीय टुमने सर, स्वर्गीय तात्या जोशी, स्वर्गीय अशोकशेठ लोखंडे आदी पदाधिकाऱ्यांनी संस्थेसाठी दिलेले योगदान, त्यांचे कार्य व स्मृतीना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, निवेदन प्रा डॉ भगवान लोखंडे तर आभार प्रा डॉ दिवाकर कदम यांनी मानले. याप्रसंगी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ओसाड काळ्या आईवर चिरनेर आदिवासींकडून फुलवली भात शेती

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

शिक्षण,नोकरी, व्यवसाय कडे वळलेली आजची पिढी त्यामुळे शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष होत आहे. त्याचप्रमाणे मजुरांचा अभाव, वाढती मजुरी मुख्य म्हणजे निसर्गाचा अनियमितपणा अशा विविध कारणांमुळे उरण परिसरातील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी ओसाड आहेत. बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे.

> " उरण परिसरातील जास्तीत जास्त जमिनी पिकाखाली आणण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत, उरण परिसरातील ओसाड पडलेल्या जमिनीवर भात पीक घेण्यास सुरुवात केली आहे यासाठी परिसरातील आदिवासींची मदत घेतली जात आहे. या आदिवासींकडून परिसरातील शेकडो एकर जमिन भात पिकाची लागवडीखाली आणण्यात येत आहे . "
>
> **(अर्चना शुळ नारनवर वर कृषी अधिकारी उरण)**

कृषी विभागाने कृषी क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी जास्तीत जास्त ओसाड जमिनी पिकाखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी आदिवासी बांधवांची मदत घेतली जात आहे. वर्षभर मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारे या समाजास भात पीक व अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आ.हे त्यामुळे चिरनेर येथील आदिवासींनी उरण परिसरातील नागरिकांच्या ओसाड शेत जमिनीत भात रोपांची लागवड करून शेकडो एकर जमिनी लागवडीखाली आणली आहे पोटाची भूक भागवणाऱ्या काळी आईला देवत्व देऊन यावर जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक प्रकारे आदर्श निर्माण केला आहे . चाणजे उरण येथील शेतकऱ्यांच्या ओसाड शेतावर गुरुवारी १७ जुलै रोजी आदिवासींनी' पट्टा' पद्धतीने भात लागवड केली आहे. यावेळी आदिवासी बांधवांना उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे चारसुत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे. शेतात रासायनिक खतांचा वापर न करता खत निर्मितीसाठी गिरीपुष्प झाडांचा पाला तसेच हिरवळीची खते वापरा असा सल्ला कृषी अधिकाऱ्यांनी देत उत्पन्न वाढीचे महत्त्व पटवून दिले पट्टा पद्धतीची लागवड व चार सूत्रीच्या लागवडीमुळे उत्पन्नात कशी वाढ होते याविषयीचे मार्गदर्शन करून युरिया ब्रिकेट खतांच्या वापराविषयी देखील माहिती यावेळी दिली. यावेळी तालुक्यातील आदिवासी वाड्यातील आदिवासी बांधवांनी पट्टा पद्धतीच्या भात लागवडीच्या प्रात्यक्षिकात भाग घेतला.

# रोटरी क्लब चिपळूणतर्फे शहरात दोन आकर्षक कारंज्यांची उभारणी

## सौंदर्य व नागरी प्रतिष्ठेचा नवा अध्याय

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी):**

रोटरी क्लब चिपळूणने सामाजिक बांधिलकीतून आणि सौंदर्यदृष्टी जपत चिपळूण शहरासाठी दोन भव्य कारंज्यांची उभारणी करून शहराच्या सौंदर्यात व प्रतिष्ठेत लक्षणीय भर घातली आहे. हे दोन्ही कारंजे सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आले असून, स्थानिक नागरिकांसाठी हे एक मनोहारी आकर्षण ठरत आहेत. रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटे. अविनाश पालशेतकर यांच्या नेतृत्वाखाली, क्लबच्या सदस्यांनी आर्थिक व तांत्रिक सहकार्य देत या प्रकल्पाचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणी केली. या उपक्रमासाठी चिपळूण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. विशाल भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले. उद्घाटनप्रसंगी रोटे. डॉ. लेनी डिकोस्टा (DISTRICT GOVERNOR 2026-27), रोटे. अजय मेनन (DEPUTY






DRFC & DGSC), रोटे. अभिजीत वालके यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रकल्पाचे आयोजन प्रोजेक्ट चेअरमन वैभव रेडीज व प्रसाद सागवेकर यांनी समर्थपणे पार पाडले. चिंचनाका येथे उभारण्यात आलेल्या "I LOVE CHIPLUN" या सौंदर्यस्थळी हे एक कारंजे अपरांत डेव्हलपर्स आणि साऊंड ऑफ म्युझिकचे मालक शैलेश टाकळे यांच्या सहकार्याने उभारले गेले. रोटरी क्लबच्या या उपक्रमाचे शहरवासीयांनी व विविध मान्यवरांनी खुले दिलाने स्वागत केले. "शहराच्या सौंदर्यात भर घालणे आणि नागरिकांना शांततेचा अनुभव देणे, हाच आमचा उद्देश होता," असे अध्यक्ष रोटे. अविनाश पालशेतकर यांनी सांगितले. पुढील काळात आणखी अशा नागरी सौंदर्यवर्धन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला श्रीराम भाऊ खरे, सीए विवेक रेळेकर सर, शैलेंद्र सावंत, मंगेश माटे, प्रशांत देवळेकर, दिनकर पवार, नितीन देवळेकर यांच्यासह अनेक रोटेरियन्स उपस्थित होते.

## सिने सृष्टीतल्या कलाकारांचा आक्रोश – शासनाच्या दुर्लक्षाविरोधात आमरण उपोषणाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**- योगिता सावंत, मुंबई प्रतिनिधी**

मुंबई, १५ जुलै २०२५ सिने सृष्टीत काम करणाऱ्या कलावंतांचा आणि तंत्रज्ञांचा आक्रोश आता रस्त्यावर उतरला आहे. 'सिने सृष्टी फिल्मी कलाकार' संघटनेच्यावतीने सरकारकडून कामगारांच्या फसव्या आश्वासनांचा निषेध करत (१५ जुलै) आझाद मैदानात बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले.

"शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करा" अशी जोरदार मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनस्थळी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. अनेक ज्येष्ठ कलाकार, कामगार, महिला सदस्य आणि तंत्रज्ञ या उपोषणात सहभागी झाले असून शासनाकडून ठोस निर्णय येईपर्यंत लढा थांबणार नसल्याचा इशाराही दिला आहे.

संघटनेने सरकारकडून वारंवार दुर्लक्ष, अनियमित कामाचे धोरण आणि रोजगाराच्या अस्थिरतेचा मुद्दा उपस्थित केला आहे. कलाकारांच्या न्याय मागण्यांसाठी सत्ताधाऱ्यांनी आता तरी जागे व्हावे, अशी भावना उपस्थितांमधून व्यक्त झाली.








# तरुण पिढीने सोशल मीडियाचा वापर योग्य प्रकारेच करावा- राजेंद्रकुमार राजमाने

## महिलांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण होणे गरजेचे - अड.स्मिता कदम

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी):--**

सध्या महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये व्हाट्सअप,फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब यासारख्या सोशल माध्यमातून नको ते व्हिडिओ, मेसेज पाहण्याचे प्रमाण वाढले आहे त्याचा परिणाम म्हणजे त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडत जाऊन त्या अत्याचाराला बळी पडत आहेत. याला वेळीच आवर घालण्यासाठी त्यांनी सोशल मीडियाचा वापर योग्य तो प्रकारेच करावा. यासाठी विद्यार्थिनी पालक व महिला यांच्यामध्ये जनजागृती होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश, चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघ, महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे येथे ' सक्षम तू ' हे अभियान पार पडले. यावेळी ते बोलत होते. या अभियानाची सुरुवात स्वर्गीय गोविंदरावजी निकम साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने आणि अड. स्मिता पाटील यांचे स्वागत उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्षा सौ. पूजाताई निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अड.स्मिता कदम या महिलांमध्ये कायदेविषयक जनजागृती संदर्भात मार्गदर्शन करताना म्हणाल्या, महिलावरील अन्याय, अत्याचार आणि शोषणास प्रतिबंध घालण्यासाठी महिलांच्यात कायद्याविषयी जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांनी कायदे व त्यांचे हक्क यांची माहिती आत्मसात केली पाहिजे. आपल्या प्रास्ताविकेमध्ये सौ. पूजा निकम म्हणाल्या, समाज



माध्यमांचा गैरवापर केल्याने दिवसेंदिवस महिलांवरील अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत चालले आहे. हे थांबविण्यासाठी त्यांच्यात महिला सक्षमीकरणाचे असे अनेक नवनवीन उपक्रम राबवण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यक्रमाप्रसंगी. प्राचार्य टी.कांबळे, कॉन्स्टेबल रेखा कदम, प्रा. पुनम भोसले, सौ.प्रिया विचारे सौ.अरुणा घाडगे सौ.सानिका भुवड सौ.पूर्वा सुर्वे याबरोबरच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीप्ती शेंबेकर यांनी केले तर आभार प्रा. माधुरी जाधव यांनी मानले.

## भ्रष्टाचार विरोधी समिती च्या फुलंब्री उपतालुका प्रमुख पदी अनिल भोसले यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**संभाजीनगर वार्ताहर**
**सतिश लोखंडे.**

भ्रष्टाचार विरोधी समिती च्या फुलंब्री तालुका उपाध्यक्षपदी अनिल भोसले यांची निवड करण्यात आली हि निवड संस्थापक अध्यक्ष सय्यद साबेर साहेब यांनी ही निवड केली आहे. अनिल भोसले यांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली असून संस्थापक अध्यक्ष सय्यद साबेर साहेब यांनी हि केली आहे.

व यापुढे भ्रष्टाचाराला



आळा घालण्यासाठी व समाजा साठी चांगले काम करण्यासाठी हि अनिल भोसले यांच्या वर सोपवली आहे. व अनिल भोसले यांनी फुलंब्री तालुक्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. व अनेक राजकीय पक्षात त्यांनी विविध पदांवर काम केले आहे. शिवसेनाचे ते तालुका प्रमुख आहे. त्यांची फुलंब्री तालुक्यात विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या व निवड झाल्या बद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले.

# दिग्दर्शक विजय धोंडू कलमकर यांची खास मुलाखत

## "'कुर्ला टू वेंगुर्ला' म्हणजे फक्त एक लग्नाची गोष्ट नाही – ती काळाच्या बदलाची गोष्ट आहे!"

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर , मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :** "शहरी आणि ग्रामीण संस्कृतींचा संघर्ष, बदललेली मूल्यं आणि लग्न संस्थेचं नव्याने होणारं पुनर्मूल्यांकन – हे सगळं एकत्र मांडायचं होतं, पण हलकंफुलकं ठेऊन!" असं म्हणतात 'कुर्ला टू वेंगुर्ला' या आगामी मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक विजय धोंडू कलमकर, ज्यांच्याशी अलीकडेच खास संवाद साधण्यात आला.

१९ सप्टेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणारा हा चित्रपट – केवळ एका लग्नाभोवती फिरणारी गोष्ट नाही, तर आजच्या तरुणांच्या मनातले गोंधळ, पालकांच्या अपेक्षा, आणि शहर-गाव यामधील अंतर मांडणारा अनुभव आहे.

कलमकर म्हणतात, "माझ्यासाठी हा चित्रपट म्हणजे संवाद – दोन पिढ्यांमधला, दोन जीवनशैलीमधला. ग्रामीण भागातील आजच्या तरुणांना काय वाटतं? आणि त्यांचं शहरात जाणं, तिथलं आकर्षण, पण त्याचवेळी गावाची ओढ – हे सगळं एका लग्नाच्या निमित्ताने मांडायचं होतं."

चित्रपटात प्रल्हाद कुडतरकर, वीणा जामकर, वैभव मांगले, सुनील तावडे यांसारखी दमदार स्टारकास्ट असून मालवणी भाषेचा खास तडका आणि विनोदी मिश्कीलपणाही चित्रपटाला वेगळी ओळख देतो.

दिग्दर्शक विजय कलमकर यांचे अनुभव :

"ग्रामीण महाराष्ट्राची नस ओळखणं आणि ती पडद्यावर तितक्याच प्रभावीपणे उतरवणं हेच आव्हान होतं. कलाकारांची निवड, लोकेशन्स, आणि संवादातली पारदर्शकता हे माझं लक्ष ठेवलं गेलं."

लेखन अमरजित आमले यांचे असून, त्यांनी वास्तववादी आणि समांतर धाटणीचा आधार घेत कथानक उभं केलं आहे. संगीत, छायांकन, ध्वनी आरेखन यामध्येही उत्तम तांत्रिक टीमचा सहभाग आहे.

कलमकर शेवटी म्हणतात, "'कुर्ला टू वेंगुर्ला' प्रेक्षकांना हसवेल, विचार करायला लावेल आणि कदाचित त्यांना स्वतःच्या आयुष्यातलं काहीतरी पुन्हा बघायला भाग पाडेल."

तर १९ सप्टेंबरपासून 'एका लग्नाची गोष्ट' अनुभवण्यासाठी थिएटरमध्ये नक्की भेट द्या!




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंर्टींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्वाभिमानीने कृषीमंत्र्यांना पाठवली कीटकनाशकाची बॉटल, रम्मी खेळतानाच्या व्हिडीओवर तीव्र संताप.

**(दामू अण्णा इंगोले)**
**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**



**वाशिम:** राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानभवनात रम्मी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, स्वाभिमानी शेतकरी संघटने कडून तीव्र संताप व्यक्त केला जात असून, संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामूअण्णा इंगोले यांनी कोकाटे यांना कीटकनाशकाची बॉटल पोस्टाने पाठवली आहे. तर कृषी मंत्र्यांनी हे जहर प्यावं आणि आत्महत्या करावी किव्हा, मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा असा संताप इंगोले यांनी व्यक्त केलाय. एकीकडे राज्यातील शेतकरी आत्महत्या करत आहेत, अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे,काही ठिकाणी पाऊस नसल्याने पेरण्या रखडल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत आणि कृषीमंत्री मात्र लोकशाहीच्या पवित्र मंदिरात रम्मी खेळत आहेत हे प्रचंड संतापदायक आहे.

कृषिमंत्री पदाला ओसाड गावची पाटीलकी म्हणणाऱ्या कोकाटे यांनी अनेकदा वादग्रस्त वक्तव्य केली आहेत. कधी ते शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात तर कधी ढेकळाचे पंचनामे करायचेत का असं म्हणून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची खिल्ली उडवतात. त्यातच आज त्यांचा रमी खेळताना चा व्हिडिओ म्हणजे नालायक पणाचा कळस असून त्यांनी तात्काळ कृषिमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.

# सौ. अनघलक्ष्मी दुर्गा यांची महिला आघाडी युवा सचिव पदावर नियुक्ती – सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**



**पुणे |** सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात आपल्या ठसा उमठवणाऱ्या सौ. अनघलक्ष्मी दुर्गा यांची महिला आघाडी युवा पुणे सचिव पदावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत होत असून, अनेक मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश शामराव कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष संतोष लांडे यांच्या नेतृत्वात ही नियुक्ती पार पडली. सौ. अनघलक्ष्मी दुर्गा या समाजातील प्रत्येक घटकाच्या न्यायासाठी सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या कार्यशक्तीला आणि नेतृत्वगुणांना मान्यता म्हणून ही निवड केली गेल्याचे मत व्यक्त होत आहे.

त्यांच्या यशस्वी पुढील कार्यासाठी रोखठोक महाराष्ट्र ग्रुप आणि समस्त पुरीगोसावी सातारकर परिवार यांच्यावतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# राळेगाव मतदार संघात युवा बेरोजगार तरुणांसाठी नवीन उद्योग सुरू करणार प्रसिद्ध उद्योगपती दिलीप सोनटक्के यांचे आश्वासन

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः–जितेंद्र खोडे

राळेगावः–प्रसिद्ध उद्योगपती दिलीप सोनटक्के यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील पुलगाव तालुक्यातील विरुळ या गावी झाला, त्यांनी अत्यंत गरिब परिस्थितीतून त्यांनी नागपूर येथे शिक्षण घेतले आणि उच्च शिक्षण मुंबई व बेंगलोर येथे झाले.प्रसिध्द उद्योगपती त्यांनी तीस वर्षा आधी अमेरिकेत गेले आहे,काही काळ नागपूर येथे वास्तव्यास होते नागपूर येथे व्हाईट हाऊस पँलेस नावाने प्रसिद्ध असलेला बंगला आहे त्यांना प्रसिद्ध उद्योगपती म्हणून ओळखल्या जाते, यावेळी राळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अड.अल्पेश देशमुख,संदीप पेंदोर भाजप कार्यकर्त, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष बाळु धूमाळ यांनी सदिच्छा भेट घेऊन राळेगाव मतदार संघात तरूण व युवा बेरोजगार लोकांसाठी आमच्या ही मतदार संघात एखाद्या उद्योग निर्माण करावा अशी विनंती प्रसिद्ध उद्योगपती दिलीप सोनटक्के यांना करण्यात आली व प्रसिद्ध उद्योगपती त्यानी सुद्धा राळेगाव मतदार संघात उद्योग निर्माण करण्याचे आश्वासन दिले व लवकरच मी राळेगाव येथे भेट देऊन राळेगाव येथे भरपूर असा मोठा उद्योग निर्माण करिल असे आश्वासन दिले यावेळी कार्यकर्त्यांनी राळेगाव मतदार संघासाठी सूवर्णभेट होईल अशी विनंती केली.



# बालयोगी श्री सर्वानंद सरस्वती महाराज यांचा जन्मदिन हजारो भक्तांच्या उपस्थितीत साजरा

**दैनिक युवक आधार :-**
**योगेश पालोदकर सिल्लोड प्रतिनिधी**



तालुक्यातील धानोरा येथील श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिर संस्थानचे पिठाधीश बालयोगी श्री सर्वानंद सरस्वती महाराज यांना शनिवार रोजी हजारो भक्तांनी जन्मदिनाच्या शुभेच्छा देऊन आशीर्वाद घेतले. धानोरा फाटा येथे असलेल्या श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिर परिसरात सकाळपासून भक्तांची मोठ्या संख्येने गर्दी झाली होती. या ठिकाणी श्री बालयोगी सर्वानंद सरस्वती महाराज यांना जन्मदिनानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी तालुक्यातील विविध राजकीय सामाजिक शैक्षणिक व विविध क्षेत्रात काम करणारे पदाधिकारी भक्तगण मोठ्या संख्येने आलेले होते .सकाळपासून रात्री उशिरापर्यंत तालुक्यातील हजारो भक्तांनी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी भक्तांसाठी अल्पोपहार ठेवण्यात आला होता. या दरम्यान माहिती देताना श्री सर्वानंद सरस्वती महाराज यांनी सांगितले की पुढील वर्षी मे महिन्यात श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिराच्या कलशारोहणाचा भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मोठा यज्ञ ठेवण्यात येणार असून यावेळी अनेक तपस्वी साधुसंतांची उपस्थिती राहणार आहे.

# करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा वाढदिवस साजरा रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**



करंजाडे ग्रामपंचायतीचे कार्यसम्राट व लोकप्रिय माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा ५० वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करंजाडे येथे करण्यात आला. या निमित्त स्थानिक प्रकल्पग्रस्थ रिक्षा चालक संघटनेनी करंजाडे जिल्हा परिषद शाळेत गरजू विद्यार्थ्यांसाठी वाह्यांचे वाटप केले. खरतर समाजात रिक्षा वाले म्हटले की अरेरावी दादागिरी करणारे अशी प्रतिमा त्यांची असते. परंतु या उपक्रमातून त्यांच्यातील माणूस आणि माणुसकी दिसून येते असे प्रतिपादन रामेश्वर आंग्रे यांनी केले या वाढदिवसा निमित्त भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते संदीप पाटील, सुनील बहिरा, गजानन पाटील, अंकुश नाईक, संतोष पवार, माजी सरपंच बळीराम म्हात्रे, ग्राम पंचायत माजी सदस्य मंगेश बोरकर, भरत राणे, निलम भगत, विद्यमान सदस्य आतिश साबळे, तुषार नागे, पोलिस पाटील कुणाल लोंढे भाजपचे कार्यकर्ते सुरेश भोईर, माणिक गायकर, संतोष भोईर, संदीप नागे, चंद्रकांत आंग्रे, रमेश आंग्रे प्रकल्पग्रस्त रिक्षा संघटना अध्यक्ष अशोक विखारे यांच्या सह पदाधिकारी तसेच विविध सोसायटींचे पदाधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळ्याचे आयोजन करंजाडे सामाजिक , सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळ यांनी व पदाधिकाऱ्यांनी केले होते. या निमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर चे आयोजन केले होते. नागरिकांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. करंजाडे मधील जेष्ट नागरिक संघटनांनी रामेश्वर आंग्रेंचा सुवर्ण महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा साजरा करून त्यांना आशीर्वाद दिले. आम्हाल विठुरायांची पंढरी आंग्रे यांनी दाखवली त्यामुळे सप्रेम भेट म्हणून विठ्ठल रुखमिनीची प्रतिकृती असलेली मूर्ती त्यांना दिली. करंजाडे सामाजिक सांस्कृतिक व सामाजिक विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आधारकार्ड शिबिर त्याच बरोबर १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होत या गुणगौरव सोहळ्यात विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी मोठ्या पर्यंत उपस्थित राहून सहभाग घेतला. "समाज सेवेचा वारसा आणि जन सेवेचा वसा" घेत समाजाचे काही तरी देणे लागतो आणि तीच भावना ठेऊन रामेश्वर आंग्रे यांनी वाढदिवसा निमित्त समाजातील प्रत्येक वर्गातील नागरिकांसाठी विविध उपक्रम ठेवले होते आणि म्हणून जेष्ठां पासून ते तरुणान पर्यंत सर्वांचे आशीर्वाद रामेश्वर आंग्रे याना लाभले करंजाडे सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळ व त्यांचे पदाधिकारी यांच्या मार्फत करंजाडे नागरिकांना विविध सण उपक्रम यांच्या मार्फत वेगवेगळी पर्वणी ते देत असतात मग ते दहीहंडी असो करंजाडे मोहत्सव नवरात्र उत्सव आरोग्य शिबिर असो किंवा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे पाणी पुरवठा किंवा रस्ते समस्या विविध समस्या साठी आंदोलने उभे करून रामेश्वर आंग्रे यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले आहे. आणि म्हणून कार्यक्रम जनसेवक सरपंच म्हणून आजही नागरिकांच्या मनावर राज्य करीत आहेत

# प्रभाग क्रमांक 29 येथील टीव्ही सेंटर परिसरात सी.सी.ट्रीमिक्स रोड उद्घाटन सोहळा आ. अर्जुन खोतकर यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जालना शहर प्रतिनिधी**
**संतोष रसवे.**



आज जालना महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष योजने अंतर्गत जालना महानगर पालिका हद्दीतील प्रभाग क्र.२९ येथील टीवी सेंटर परिसरात सी.सी. ट्रिमिक्स रोड उद्‌घाटन सोहळा अंदाज समिती प्रमुख तथा आ. अर्जुन खोतकर यांच्या हस्ते पार पडला.

या कार्यक्रमाला उपस्थित सर्व नागरिकांशी आ अर्जुन खोतकर यांनी संवाद साधला व त्यांच्या विविध अडचणी जाणून घेत तात्काळ काही विषयांवर संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावून लवकरात लवकर नागरिकांना होणाऱ्या अडचणींना सोडवावे असे आदेशित केले व जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता मी सदैव आपल्या सेवेत आपला भूमिपुत्र म्हणून तत्पर असल्याचं मत यावेळी व्यक्त केले.

टीव्ही सेंटर परिसरातील विविध विकास कामासंदर्भात उपस्थित नागरिकांनी यासंदर्भात ग्वाही दिली व आपण जो शब्द दिला होता तो पुरेपूर पाळलाय आणि आपल्या प्रभागातील झालेल्या विकास कामांना घेऊन उपस्थित लोकांनी आपला आनंद आ. अर्जुन खोतकर यांच्याशी बोलताना व्यक्त केला. याप्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, गणेश सुपारकर, लक्ष्मण नाना अवघड, मेघराज चौधरी, गोपी गोगडे, ज्ञानेश्वर सुपारकर, शिवसिंग तलवारवाले, प्रवीण जगताप, राऊत मामा, संतोष रासवे, ज्ञानेश्वर ढवळे, अनिल देशमुख, रामेश्वर गोरे, भगवान धिरडे, नारायण तारगे, पटेकर काका, सोपान काका, मुनरकर मदन देशमुख, अजय मापारी, आकाश गोरे, प्रमोद पवार, प्रवीण जगताप, रोहिणी टकले, संगीता देशमुख, शारदा गोरे, तसेच शिवसेना - युवासेना सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ओसाड काळ्या आईवर चिरनेर आदिवासींकडून फुलवली भात शेती

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

शिक्षण,नोकरी, व्यवसाय कडे वळलेली आजची पिढी त्यामुळे शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष होत आहे. त्याचप्रमाणे मजुरांचा अभाव, वाढती मजुरी मुख्य म्हणजे निसर्गाचा अनियमितपणा अशा विविध कारणांमुळे उरण परिसरातील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी ओसाड आहेत. बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. कृषी विभागाने कृषी क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी जास्तीत जास्त ओसाड जमिनी पिकाखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी आदिवासी बांधवांची मदत घेतली जात आहे. वर्षभर मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारे या समाजास भात पीक व अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आ.हे त्यामुळे चिरनेर येथील आदिवासींनी

**"उरण परिसरातील जास्तीत जास्त जमिनी पिकाखाली आणण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत, उरण परिसरातील ओसाड पडलेल्या जमिनीवर भात पीक घेण्यास सुरुवात केली आहे यासाठी परिसरातील आदिवासींची मदत घेतली जात आहे. या आदिवासींकडून परिसरातील शेकडो एकर जमिन भात पिकाची लागवडीखाली आणण्यात येत आहे ."**
**(अर्चना शुळ नारनवर वर कृषी अधिकारी उरण)**

उरण परिसरातील नागरिकांच्या ओसाड शेत जमिनीत भात रोपांची लागवड करून शेकडो एकर जमिनी लागवडीखाली आणली आहे पोटाची भूक भागवणाऱ्या काळी आईला देवत्व देऊन यावर जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक प्रकारे आदर्श निर्माण केला आहे . चाणजे उरण येथील शेतकऱ्यांच्या ओसाड शेतावर गुरुवारी १७ जुलै रोजी आदिवासींनी' पट्टा' पद्धतीने भात लागवड केली आहे.

यावेळी आदिवासी बांधवांना उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे चारसुत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे. शेतात रासायनिक खतांचा वापर न करता खत निर्मितीसाठी गिरीपुष्प झाडांचा पाला तसेच हिरवळीची खते वापरा असा सल्ला कृषी अधिकाऱ्यांनी देत उत्पन्न वाढीचे महत्त्व पटवून दिले पट्टा पद्धतीची लागवड व चार सूत्रीच्या लागवडीमुळे उत्पन्नात कशी वाढ होते याविषयीचे मार्गदर्शन करून युरिया ब्रिकेट खतांच्या वापराविषयी देखील माहिती यावेळी दिली. यावेळी तालुक्यातील आदिवासी वाड्यातील आदिवासी बांधवांनी पट्टा पद्धतीच्या भात लागवडीच्या प्रात्यक्षिकात भाग घेतला.

# किर्तनातून परिवर्तनाची मशाल, महंत राधाताई महाराज यांचा "मातोश्री" पुरस्काराने सन्मानित

## मुक्ताई ज्ञानपीठ, पुणतांबा यांच्या वतीने महंत रामानंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील वारकरी परंपरेत सामाजिक प्रबोधनाचा प्रकाश पसरवणाऱ्या, संत मिराबाई आईसाहेब संस्थान महासांगवीच्या महिला मठाधिपती महंत राधाताई महाराज यांना "मातोश्री सन्मान– २०२५" या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. पुणतांबा येथील संत मुक्ताई ज्ञानपीठाच्या वतीने, शनिवार दिनांक–१९ जुलै रोजी संस्थान परिसरात पार पडलेल्या भव्य समारंभात मुक्ताई ज्ञानपीठाचे प्रमुख महंत स्वामी रामानंदगिरी महाराज यांच्या शुभहस्ते त्यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. मागील तीन दशकांपासून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर ही किर्तनसेवेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, स्त्रीभ्रूणहत्या विरोधी जनजागृती, व्यसनमुक्ती आणि नारीशक्तीच्या उत्थानासाठी केलेले कार्य हे अत्यंत उल्लेखनीय असून, एक महिला असून ही अध्यात्म, परंपरा आणि समाजकार्य यांचे समन्वय साधत वारकरी संप्रदायात त्यांनी एक नवा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक योगदानाची दखल घेत मुक्ताई ज्ञानपीठाने त्यांची "मातोश्री सन्मान– २०२५" या पुरस्कारासाठी निवड केली. या गौरव सोहळ्यात बोलताना महंत रामानंदगिरी महाराज म्हणाले की, "अत्यंत कमी वयात संस्थानाची धुरा सांभाळत राधाताई महाराज यांनी वारकरी परंपरेच्या पताकेला समाजहितासाठी सन्मानाने फडकावले आहे. त्यांनी अध्यात्मात राहून समाजकार्याची जोड देत एक नवा आदर्श उभा केला असून, त्यांच्या कार्यामुळे आज अनेक स्त्रियांचं प्रेरणास्थान निर्माण झालं आहे. हा सन्मान त्यांच्या कार्याचा केवळ गौरव नसून, वारकरी संप्रदायातील मूल्यांचा पुनःप्रकाशही आहे." कार्यक्रमात संस्थानच्या वतीने महंत रामानंदगिरी महाराज यांचा ही आदरपूर्वक सत्कार करण्यात आला. या वेळी पत्रकार ॲड. महेश बेदरे यांनी सन्मानपत्राचे प्रभावी वाचन केले. सोहळ्याला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्वामी सानप, शिवाजी गर्जे, मातोश्री कुसुमताई सानप, मुक्ताई ज्ञानपीठाचे उत्तराधिकारी स्वरूपानंदगिरी महाराज, श्रीमती दिपाली श्रीनिवास गुडघे, श्रीनिवास गुडघे, भारत नवले यांच्या सह ग्रामस्थ, संस्था सदस्य व भाविक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## फुले, शाहू चॅरिटेबल अँड वेल्फेअर फाउंडेशन महाराष्ट्र न्यूज चैनल च्या अध्यक्षपदी संजीव भांबोरे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**
**भंडारा-** प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस , विविध वर्तमानपत्रात लेखणीच्या रूपाने सक्रिय असलेले आणि विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले पहेला, तालुका भंडारा ,महाराष्ट्र येथील निवासी संजीव भांबोरे यांची फुले,शाहू चॅरिटेबल अँड वेल्फेअर फाउंडेशन महाराष्ट्र न्यूज चॅनलच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी फुले, शाहू चॅरिटेबल अँड वेल्फेअर फाउंडेशनचे ठाणे (मुंबई) येथील डायरेक्टर पुजा हिंगोले, व विजय शिवाजीराव हिंगोले यांनी एका लेखी पत्रकाद्वारे नियुक्ती केलेली आहे.




## भाजपा शहराध्यक्ष डॉ.कुणाल भोयर यांच्या वाढदिवसानिमित्त गरजवंताना ब्लँकेट वाटप

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**
राळेगावः-तालुक्यातील चिखली येथे कार्यकर्त्याच्या पुढाकाराने भाजपा शहराअध्यक्ष तथा जळका धानोरा जिल्हापरिषद सर्कल चे लोकनेते यांच्या वाढदिवसानिमित्त चिखली गावात वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला, फटाक्याच्या अतिशबाजीत डॉ.कुणाल भोयर यांचे स्वागत करण्यात आले,तसेच



वाढदिवसानिमित्त गरजु व अपंग लोकांना/महिलांना ब्लँकेट वाटप करण्यात आले,यावेळी डॉ.कुणाल भोयर यांनी आपले मत मांडताना गावातील लोकांना कोणतेही अडचणी आल्यास कुणाल भोयर सदैव तुमच्या सोबत उभा आहे, ब्लँकेट वाटप करतांना गरजु व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून येत होते,वयाने लहान असला तरी गावाप्रती जी तळमळ आहे ती या सर्व गोष्टी मधून दिसून येते असे नागरिकांमध्ये चर्चा दिसून येते, या पुढेही असेच लोकहिताचे सामाजिक कार्यक्रम होत राहणार असे लोकेश दिवे मित्रपरिवार तर्फे सांगण्यात येत आहे,यावेळी लोकेश दिवे मित्रपरिवारातील दुर्वेश उमाटे,स्वप्नील ठाकरे,जगदीश उमाटे,गजानन भटकर, धिरज उमाटे, प्रभाकर हुलके,अभिलाष नागपुरे,क्षितिज घायवटे,साहिल वनकर, यासह गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

# सेलू येथे गुणवंत विद्यार्थ्यांना पेन व प्रमाण देउन सत्कार करण्यात आला



**दैनिक युवक आधार**
**सेलु प्रतिनिधीः- महेश राऊत**
दिनांक 20 जुलै रविवार रोजी मातंग समाजातील 10 वी आणि 12 वी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सेलू येथील नुतन विद्यालय सभागृह येथे पार पडला यावेळी मातंग समाजातील 30 विद्यार्थ्यांना लो.अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा, प्रमाणपत्र व एक पेन भेट देऊन सत्कार करण्यात आला.
यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लो.अण्णाभाऊ साठे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एन.पवार, एस.के.ग्रुपचे मालक सिद्धुभाऊ खोसे साहेब, शिवशिवसेना शहर प्रमुख अजय दादा दळवे,सरपंच नानासाहेब वनवे, सरपंच महादेवराव लोंढे,रमेशराव गोपले, वाघमारे साहेब उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी उत्तमराव गोपेकर, सटवाजी साठे, अरुण थोरात, अरुण हिवाळे,महेश गायकवाड सतीश राव जाधव, सुशील कुमार तोगरे , नारायणराव बोकेफोड,संजयराव साळवे,साहेबराव गोरे ,बारडकर सर, अशोक मुजमुले, सचिन मजमुले यांनी परिश्रम घेतले.

## जोगेश्वरी (पूर्व ) येथील शालेय विद्यार्थ्यांची बुद्धिबळ स्पर्धेत चमकदार कामगिरी !

दैनिक युवक आधार
किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई | २० जुलै २०२५** – जागतिक बुद्धिबळ दिनानिमित्त आयोजित "WEONECHESS AWARENESS TOURNAMENT" या स्पर्धेत जोगेश्वरी (पूर्व) येथील दुर्वेश दशरथ घाडी या शालेय विद्यार्थ्याने उत्तम कामगिरी करत ट्रॉफी आणि पदक जिंकून आपली बुद्धिमत्ता आणि खेळातील कौशल्य सिद्ध केले आहे.
मुंबईच्या शिवसेना कार्यालय (जोगेश्वरी पूर्व) येथे पार पडलेल्या या स्पर्धेत RAPID 10+3 मिनिटांच्या नॉकआउट फॉरमॅटमध्ये खेळ घेण्यात आले. केवळ ₹५० शुल्क असलेल्या या स्पर्धेत विविध वयोगटांतील अनेक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा कडव्या स्पर्धेत दुर्वेशने आपली छाप सोडत विजेत्यांमध्ये स्थान मिळवले, हे विशेष उल्लेखनीय आहे.
स्पर्धेनंतर दुर्वेशने आपल्या श्री साई बाबा मूर्तीसमोर ट्रॉफी दाखवत कुटुंबाचा आणि परिसराचा गौरव केला. यावेळी श्री साई बाबा मंदिर, जोगेश्वरी (पूर्व) येथे त्याचे विशेष स्वागत करण्यात आले. मंदिराचे अध्यक्ष महेंद्र केळकर व सचिव विवेक दळवी यांनी त्याचे सत्कार व अभिनंदन केले. त्याच्यासोबत असलेल्या प्रशिक्षक व पालक यांच्या चेहऱ्यावर अभिमान झळकत होता.
ST. MARY HIGH SCHOOL, जोगेश्वरी (पूर्व) येथे इयत्ता ९वीत शिक्षण घेणाऱ्या दुर्वेश याच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. भविष्यातील स्पर्धांमध्ये तो आणखी मोठे यश मिळवो, अशा शुभेच्छा त्याला सर्व स्तरातून दिल्या जात आहेत.






## राजमाता,राष्ट्रमाता,अहिल्यादेवी होळकर यांच्यावरील खालच्या भाषेत टिपणी

### सुनिल उभे याच्यावर कडक कारवाई करण्यात यावी -रासपच्या वतीने पैठण पोलीसांना निवेदन


**दैनिक युवक आधार**
मराठवाडा विभाग पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,फेसबुकवर राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या बाबत अश्लील भाषेत टिपणी करुण समाजाच्या



भावना दुखवल्या बाबत सुनिल गोपाळराव उभे याच्या विरुध्द चौकशी करुण गुन्हा दाखल करण्यात यावा,दि.१८/७/२०२५ रोजी सुनिल गोपाळराव उभे याने त्याच्या वैयक्तीक फेसबुक प्राफाईलवरुन राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्याबाबात अत्यंत अश्लिल,अपमानकारक,आणि खालच्या स्तराची टिपणी केली आहे.या विधानामुळे फक्त होळकर कुटूंबीय नव्हे तर राजमाता आहिल्यादेवींचे कार्य व आदर्श मानणाऱ्या समस्त जनतेच्या भावना तीव्ररित्या दुखावल्या गेल्या आहेत.हे कृत्य अत्यंत निषेधार्ह आहे.व समाजात तनाव निर्माण करणारे आहे.तरी सदर प्रकरणाची चौकशी करुण गुन्हा दाखल करण्यात यावा,भविष्यात असे कृत्य कोणीही करणार नाही.यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी.व आपन या तक्रारीची गंभीर दखल घेवुन तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन पैठण पोलीस ठाणेचे निरीक्षक महादेव गोमारे यांना दिले आहे.
दिलेल्या निवेदनावर राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रकाश दिलवाले,महात्मा फुले समता परिषद तालुका अध्यक्ष देविदास सोनवणे,जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर ताकपीर,संतोष सोनवणे ता.कार्याध्यक्ष,कृष्णा जाधव ता.उपाध्यक्ष,एकनाथ वीर ता.उपाध्यक्ष,सोमनाथ अवधुत ता.उपाध्यक्ष,सचिन जाधव ता.संघटक,गणेश वीर सर्कल प्रमुख पिंपळवाडी,भाऊसाहेब वीर,सुभाष नवले यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# सिमेंट रस्ता कधी होणार?,रिठद ग्रामपंचायत मध्ये तक्रारीचा ओघ, दलितावर अन्याय ?

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजीत ठाकूर**
रिसोड तालुक्यातील रिठद येथील ग्रामपंचायत चे ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी यांचे कायम दुर्लक्ष असल्याचा आरोप रिठद गावातील अढळनगरातील अनेक नागरिकांनी रिठद ग्रामपंचायतला दिलेल्या निवेदनात केला आहे.वार्ड क्रं.५ मधील त्यांच्या घरासमोरील मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरलेले असून घरामध्ये जातांना चिखल तुडवत घरामध्ये ये-जा करावी लागत आहे.आत्तापर्यंत या रस्त्यावर सिमेंटचा रस्ता करायला पाहिजेत होता . परंतु या ग्रामपंचायतने याच पाच वर्षांत आत्तापर्यंत तिन सरपंच बदलले व हे चौथे सरपंच झाले. तरीही या सरपंचाला व ग्रामपंचायत अधिकाऱ्याला या रस्त्याबाबत दखल घ्यावीशी वाटली नाही. या अस्वच्छतेमुळे आमच्या लोकांवर अन्याय होत असून जाणून-बुजून राजकीय हेतूने प्रेरित अशी कामे चालू असून आमच्या घरापुढे रस्ता अद्यापही सिमेंट काँक्रीट झाला नाही. याबाबत तोंडी, वारंवार सुचना संबंधित ग्रामपंचायतला सूचित केले. परंतु आम्हाला रोज मजुरीला जावे लागते, तेथे राहणे मुश्कील झाले.त्यामुळे प्रत्येक वेळी ग्रामपंचायतच्या कार्यालयात जाऊ शकत नाही.




त्यामुळे सर्व अढळनगरातील नागरिकांनी कंटाळून आज दि.१८ जुलै रोजी ग्रामपंचायत अधिकाऱ्याला रस्त्यावरील दुर्गंधीचा वास येत असल्याने त्याबाबतची दखल घेण्याकरिता निवेदन दिले.या निवेदनाची दखल न घेतल्यास उपोषणाला बसावे लागल्यास तेही करण्यात येईल.असेही बोलतांना या नागरिकांनी सांगितले.याबाबतच्या निवेदनाच्या प्रती रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कंटाळा साहेब, रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चव्हाण, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस वाशिम. यांना या तक्रारीची दखल घेण्यासाठी निवेदने दिली आहेत.या निवेदनावर मोहन संपत अंभोरे, अशोक कांबळे ,माधव गायकवाड, विनोद खरात, वंदना इंगळे, तसलम शहा, गुलाब हुसेन विनोद अंभोरे, किशोर गायकवाड, विलास गायकवाड, सद्दाम पठाण, शैलेश अंभोरे, केशव गजानन, योगेश अंभोरे, दीपक भगत, सौरभ ठाकरे इत्यादी आढळ नगरातील लोकांच्या निवेदनावर सह्या आहेत.



दैनिक युवक आधार :- रायमोहाचे भूमिपुत्र चि.प्रताप गोवर्धन जाधव यांची MPSC मार्फत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महसूल सहाय्यक पदावर नेमणूक झाली. त्या निमित्त त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देताना. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.शेख जमीर साहेब, वाहतूक शाखेचे ए.पी.आय.रायमोहा चे भुमिपुत्र श्री.सुभाषजी सानप साहेब, श्री शेख ताजुद्दीन सर, फैय्याज पठाण सर, श्री.अंबादास जाधव सर, श्री.जाधव राहुल(भैय्या ), अकिब पठाण सह इतर मित्र परिवार
(छाया – शेख महेशर ताहेर, पाटोदा)

## करंजाडेत ज्येष्ठ नागरिकांना "आयुष्मान वय वंदना" कार्डचे वाटप,

### आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने करंजाडेत सामाजिक उपक्रम, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
उरण विधानसभा मतदार संघांचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्यावतीने करंजाडे वसाहतीतील जेष्ठ नागरिकांना गरीब आणि गरजू लोकांसाठी 'आयुष्मान वय वंदना या योजनेअंतर्गत कार्डचे वाटप करण्यात आले. या कार्डद्वारे जेष्ठ नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळणार असल्याचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी सांगितले. यावेळी आमदार महेश बालदी यांना म्हात्रे यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, भाजप नेते




बळीराम म्हात्रे, गजानन पाटील, राकेश गायकवाड, मनखुश नाईक, समीर केणी, नितेश सोलंकी, मंगेश बोरकर,उमेश भोईर केतन आंग्रे, संदीप नागे, प्रमोद शिकारे, निखिल डांगे, ओंकार चौधरी यांच्यासह महिला, जेष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.